महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १९ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुसळधार



## कल्याण, डोंबिवली, बदलापुरात पावसाची दमदार हजेरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. १८**

**हवामान खात्याने ४८ तासांसाठी मुंबई, रायगड, ठाणे जिल्ह्यात रेड अलर्ट जाहीर केला असून, रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे उल्हास नदीच्या पाणीपातळीत कमालीची वाढ होत आहे. बदलापुरात पावसाचा जोर जास्त नसला तरी उल्हास नदी उगम पावते त्या रायगड जिल्ह्यात जोरधार पाऊस पडत आहे. परिणामी बदलापुरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पाणीपातळीत चांगलीच वाढ होत आहे.**

**कल्याण :** काही दिवसांपूर्वी शांत झालेल्या पावसाने पुन्हा दमदार सुरुवात केली आहे. दहीहंडीपासूनच मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात चांगला पाऊस कोसळत आहे. याचाच परिणाम हा रायगड जिल्ह्यातून उगम पावणाऱ्या उल्हास नदीवर होत असून, बदलापुरातून वाहणाऱ्या नदीपात्रात कमालीची वाढ झाली आहे. सध्यातरी उल्हास नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीकाठावरील चौपाटीच्या पायऱ्या पाण्याखाली गेल्या असून, पुढील २४ तास पावसाचा जोर कायम राहिला, तर मात्र उल्हास नदी धोक्याची पातळी गाठण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुढील धोका ओळखून स्थानिक प्रशासन नदीच्या पाण्याची नोंद घेत असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

कल्याण पश्चिमेच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात पहाटेपासून सुरू असलेल्या पावसामुळे पाणी साचलेले, तर कल्याण लोहमार्ग पोलिस स्टेशन मध्ये पावसाचे पाणी शिरल्याने पाण्यात पोलिसांना आपले कामकाज करण्याची वेळ आली. मानपाडा पोलीस स्डॉटेशनमध्ये देखील पाणी साचले होते. बाबासाहेब आंबेडकर चौक रस्ता परिसरात देखील पाणी साचले होते. या साचलेल्या पाण्यातून वाट काढताना वाहन चालक तसेच नागरिकांना मोठी कसरत करावी लागत होती. डायघर परिसरात पाणी साचले होते. कोपर परिसरात पाणी साचल्याने सखल भागातील घरात पाणी शिरले.

ऐन गणपती सण तोंडावर आला असताना खरेदीसाठी बाहेर पडलेल्यांचा पावसामुळे हिरमोड झाला. तर फेरीवाले, ठेलेवाले यांची पावसामुळे आपल्या विक्री मालाचे नुकसान होऊ नये म्हणून पळापळ झाली. काळूनदी, उल्हासनदी या पावसामुळे दुथडी भरून वाहत होत्या.

तर नेतवली टेकडी परिसरातील भवानी नगरात दोन घरावर टेकडीवरील दगड माती कोसळल्याने दोन घराचे नुकसान झाले. सोमवारी दुपारी तीन साडेतीन सुमारास ही घटना घडली.घरातील सदस्य घराच्या बाहेर असल्याने जिवितहानी टळली.घटनास्थळी केडीएमसी आप्तकालीन व्यवस्था टीम,अग्निशमन दलाचे जवान यांनी पोहचत आढावा घेत मदत कार्य सुरू केले. कल्याण पश्चिमेतील भगवा तलाव दोन दिवसाच्या पावसामुळे काठोकाठ तुडंब भरला असल्याने फेरफटका मारणार्याची पाहण्यासाठी संख्या वाढली होती. कल्याण पश्चिमेतील पारनाका लाल चौकी रस्त्यावर धोकादायक इमारतीचा स्लँब कोसळल्याची घटना सकाळी घडली धोकादायक इमारत असल्याने रिकामी होती.त्यामुळे जिवितहानी टळली. डोंबिवली एमआयडीसी परिसरात रस्त्यावर पाणी साचल्याने लोकांना पाण्यातून ये जा करण्याची वेळ आली. तर कल्याण ग्रामीण परिसरातील म्हारळ ,कांबा, टिटवाळा मोहने, बल्याणी, उंभर्णी, रुंदे ,आदि गाव परिसरात पावसाचा जोर असल्याने शेती कामाचा वेग मंदावला होता.

थोडक्यात महत्वाचे

## मुंबई बाजार समितीवर प्रशासकीय राजवट ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

तुर्भे, ता. १७ : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी मागील दीड महिन्यांपासून मतदार याद्यांवर ठाणे तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांच्या वतीने खलबते कुटली जात आहेत. दुसरीकडे विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ संपायला अवघे १५ दिवस शिल्लक राहिल्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला नाही. त्यामुळे वेळेत संचालक मंडळाची निवडणूक न घेता बाजार समितीवर प्रशासक राजवट आणून गाडा हाकण्याची शक्यता एका संचालकाने नाव न सांगण्याच्या अटीवर व्यक्त केली आहे. नवी मुंबई शहरात सध्या पुनर्विकासाचे वारे वाहत आहेत. अशातच मुंबई कृषी उत्पन्न बाजार आवारातील इमारतीदेखील धोकादायक झाल्या असून त्यांचा पुनर्विकास प्रस्तावित आहे. सर्वात प्रथम कांदा-बटाटा मार्केटचा पुनर्विकास होणार आहे. त्यामुळे बाजार समितीच्या १७५ एकर जागेवर पुनर्विकास होणार असल्याने विकसकांसह राजकारण्यांच्या नजरा याकडे वळल्या आहेत. अशातच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाचा पंचवार्षिक कार्यकाळ रविवारी (ता. ३१) संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नवीन संचालक निवडीसाठी निवडणूक प्रकिया सुरू करण्याच्या सूचना राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणच्या सचिवांनी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.ऊ.बा.स.) ठाणे तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांना १ जुलैला दिल्या आहेत; मात्र या सूचना देऊन दीड महिना होत आला तरी निवडणुकीबाबत काहीच हालचाली सुरू नाही. फक्त मतदारयादीवर काम सुरू असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

## मेट्रोचा गलथान कारभार नेतीवलीत बसचा अपघात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १८ (बातमीदार)** : शहरात सध्या ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो लाइन पाच आणि कल्याण-तळोजा मेट्रो लाइन १२ या दोन्ही प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामांमुळे वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. नेतीवली परिसरात रविवारी (ता. १७) रात्री अरुंद रस्त्यावरून जात असताना अंदाज न आल्याने एका परिवहनच्या बसचा अपघात झाला आहे. अंधार असल्याने बसचालकाला अंदाज आला नाही. ही बस मेट्रोने उभारलेल्या सुरक्षा भिंतीवर आदळली. या अपघातात चालक-वाहक थोडक्यात बचावल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

मेट्रोचे काम करताना हलगर्जी होत असल्याचा आरोप स्थानिक रहिवासी अंकुश इंगळे यांनी केला आहे. मेट्रोच्या कामामुळे रस्ता अरुंद झाला असून, या परिसरात वीज नाही, शिवाय धोका दर्शविणारे रेडियमदेखील लावलेले नसल्याने चालकांना रात्रीच्या अंधारात रस्त्याचा अंदाज लागत नाही.

वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दखल घेत नसल्याचेही इंगळे म्हणाले. मागील काही दिवसांपूर्वी मेट्रो पाचच्या कामादरम्यान रिक्षा प्रवाशाच्या डोक्यात सळई घुसल्याची घटना ताजी आहे. त्यामुळे कुणाचा जीव गेल्यानंतर खबरदारी बाळगणार का, असा सवाल या वेळी उपस्थित केला आहे.

## मुरबाडच्या सर्वांगीण विकासाला चालना

### जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी घेतली आमदार किसन कथोरे यांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी मुरबाड तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील निसर्गसंपन्न आणि पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असलेल्या काळू धबधब्याला प्रथमच भेट दिली. थितबी येथील वन विभागाच्या रिसॉर्टवर जिल्हाधिकाऱ्यांचे आमदार किसन कथोरे यांनी स्वागत केले. या भेटीदरम्यान मतदार संघातील विविध विकासकामे, पर्यटन विकास, पर्यावरण



संवर्धन आणि नागरी सुविधा या विषयांवर चर्चा झाली. स्थानिक पातळीवर पर्यटनाला चालना देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

> काळू धबधबा, निसर्ग पर्यटनाची अपार शक्यता असलेले ठिकाण असून त्याच्या समतोल आणि शाश्वत विकासासाठी प्रशासकीय सहकार्य अत्यंत गरजेचे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन व्यक्त केला, ही आनंदाची बाब आहे.
>
> ●आ. किसन कथोरे मुरबाड

## ठाणे मनोरुग्णालयात औषधांचा तुटवडा?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. १८ :** राज्यातील विविध मनोरुग्णालयांमध्ये औषधांचा साठा अवघा काही महिने पुरेल इतकाच शिल्लक असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. प्रशासकीय कारणांमुळे व निधीच्या कमतरतेमुळे कमी प्रमाणत औषधांचा पुरवठा होत आहे. अशातच ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयातदेखील अवघे दोन महिने पुरेल इतकाच औषधांचा साठा शिल्लक असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मानसिक आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांवर औषधोपचाराविना गंभीर परिणाम होण्याची शक्यता काही तज्ज्ञ डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

खरेदी प्रक्रियेतील विलंब आणि निधीअभावी मागील डिसेंबर महिन्यापासून राज्यातील मनोरुग्णालयांत कमी प्रमाणात औषधपुरवठा करण्यात येत असून, औषध पुरवठा खंडित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मनोरुग्णांवर उपचार करण्यात अडचणी निर्माण होत असल्याची माहिती सत्रांनी दिली.




## अंबरनाथ नगर परिषद निवडणुकीसाठी - प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** १० जून २०२५ च्या शासननिर्णय क्र-एमसीओ-२०२५/प्र.के. २०६/नवि-१४ नुसार महाराष्ट्रअधिनियम, १९६५ च्या कलम १० च्या पोटकलम १ (अ) मधील तरतुदीनुसार राज्यशासन राज्य निवडणूक प्रभागाची संख्या व सीमा राज्य शासन ,राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी प्रभागाची संख्या व सीमा राज्यशासन राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने शासकीय अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करतील अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसारअंबरनाथ नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी आज दिनांक १८ ऑगस्ट रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली. सदर प्रभाग रचनेवर दिनांक १८ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत आक्षेप हरकती सूचना मागविण्यात येत आहेत.सदर हरकती प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ ते ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत प्राप्त हरकतीवर सुनावणी घेण्यात येईल. अंबरनाथ नगर परिषद मध्ये एकूण २९ प्रभाग असून ५९ सदस्य निवडून द्यायचे आहेत. त्यामध्ये आपले २८ प्रभाग हे द्वीसदस्य प्रभाग आहेत व १ प्रभाग हा त्रिसदस्य प्रभाग असणार आहे.







## मुंबई विद्यापीठाचे कामकाज मराठी भाषेतून चालवावे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, ता. १८ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर तिचा सन्मान करत तिच्या संवर्धनासाठी मुंबई विद्यापीठाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. राज्याच्या राजधानीतील हे विद्यापीठ राज्याचीच नव्हे तर देशातील विद्यापीठांमध्ये आपली एक वेगळी ओळख ठेवून असल्याने विद्यापीठातील सर्व कामकाज मराठी भाषा धोरणानुसार मराठीतून केले जावे, अशी मागणी मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. सखाराम डाखोरे यांनी विद्यापीठाकडे केली आहे.



- सिनेट सदस्य डॉ. डाखोरे यांची मागणी

मराठी भाषा धोरणानुसार राज्यातील सरकारी कार्यालये, संस्था, वित्तीय संस्था यांच्यासह सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांचे कामकाजही मराठी भाषेतून होणे आवश्यक आहे. त्यात महाराष्ट्राच्या राजधानीत सर्वात जुने विद्यापीठ असलेल्या मुंबई विद्यापीठाने मराठीच्या सन्मानार्थ आणि तिच्या वारशाचे जतन करत आपल्याकडील सर्व कामकाज मराठीतून सुरू करून त्याचा एक पायंडा निर्माण करावा. यामुळे राज्यातील इतर विद्यापीठांमध्येही त्याप्रमाणे मराठी भाषेचा आदर केला जाईल, सर्व कामकाज मराठीतून होण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा. डॉ. डाखोरे यांनी व्यक्त केली आहे.

## गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे । मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ १८-५९ ॥

तू अहंकार धरून मी युद्ध करणार नाही, असे मानतोस, तो तुझा निश्चय व्यर्थ आहे, कारण तुझा स्वभाव तुला जबरदस्तीने युद्ध करावयास लावील. ॥ १८-५९ ॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा । कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ १८-६० ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), जे कर्म तू मोहामुळे करू इच्छित नाहीस, तेही आपल्या पूर्वकृत स्वाभाविक कर्माने बद्ध असल्यामुळे पराधीन होऊन करशील. ॥ १८-६० ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ॥ १८-६१ ॥

हे अर्जुना, अंतर्यामी परमेश्वर आपल्या मायेने शरीररूपी यंत्रावर आरूढ झालेल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या कर्मांनुसार फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयात राहिला आहे. ॥ १८-६१ ॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत । तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ १८-६२ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), तू सर्व प्रकारे त्या परमेश्वरालाच शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तुला परमशांती आणि सनातन परमधाम मिळेल. ॥ १८-६२ ॥

## आरोग्य
### रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी वेलचीचे फायदे



वेलचीमध्ये टेरपिनेन, जेरेनिल एसीटेट, जेरेनिओल, बोर्निओल आणि सिट्रोनेलॉल सारखे रासायनिक घटक असतात, जे शरीराच्या रक्तवाहिन्या आराम देतात आणि रक्त परिसंचरण सुधारतात . ते कॅल्शियम चॅनेल ब्लॉकर्स सारख्या औषधांसह एकत्रित केले जाते, जे उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते . यासोबतच, त्यात मूत्रवर्धक गुणधर्म देखील आहेत, जे शरीरातील अतिरिक्त पाणी आणि विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात. म्हणजेच, त्याला सर्वोत्तम डिटॉक्स म्हणतात.

**वेलची पचनसंस्था सुधारते**

वेलची खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित होते हे फार कमी लोकांना माहिती आहे. वेलची खाल्ल्याने अन्नाचे पचन सोपे होते आणि पोटात सूज किंवा जडपणाची समस्या कमी होते. वेलची श्वास ताजेतवाने ठेवण्यासाठी देखील खूप प्रभावी आहे. ते शरीरातील सूज कमी करते आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी करून हृदयाचे आरोग्य सुधारते.

## आश्रमशाळेत वास्तव्य करण्यास शिक्षकांची टाळाटाळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयानुसार मुख्यालयी वास्तव्यास राहणे बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात ते राहत नसल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्याने या संदर्भात सर्व संबंधित मुख्याध्यापकांना तत्काळ शहानिशा करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते वामन खाकर यांनी 26 जुलै रोजी 'आपले सरकार' पोर्टलवर याबाबत तक्रार नोंदवली होती. त्यानुसार, अनेक कर्मचारी खोटे पुरावे सादर करून मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे दाखवतात; मात्र प्रत्यक्षात ते बाहेर राहत असल्यामुळे सरकारची फसवणूक व धोरणभंग होत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. या तक्रारी सोबत आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक जोडले असून, त्यात कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास असणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट नमूद आहे. तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक प्रकल्प अधिकारी डी. डी. काळपांडे यांनी सर्व मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष शहानिशा करून स्वयंस्पष्ट अहवाल तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सरकारी निर्णयांचे उल्लंघन करणारे आणि खोटे पुरावे सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमांनुसार कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही आदेशात दिला आहे. या बाबत सामाजिक कार्यकर्ते वामन खाकर यांनी सांगितले की अनेक आश्रमशाळा दुर्गम भागात असल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक आहे. सरकारी निर्णय व संहितेतील तशी तरतूद आहे. या आदेशाचे पालन न झाल्यास मुलांच्या शैक्षणिक उद्दिष्टांवर व गुणवत्तेवर परिणाम होतो. मुख्यालयी वास्तव्यास राहिल्यास विद्यार्थ्यांची प्रगती निश्चितच सुधारेल हाच या तक्रारी मागील उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

## कर्मचारी अभिलेख डिजिटलाईज करण्यास मुदतवाढ मिळावी
### - सुधीर घागस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन 2025 मध्ये शालार्थआयडी देताना गैरप्रकार आढळून आल्याबाबतच्या तक्रारी शासनास निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित करून त्रीसदस्यीय विशेष चौकशी पथक स्थापन केले. त्यानुसार 2012 ते आज पर्यंतच्या नियुक्त व मान्यता प्रकारांची चौकशी करावयाची आहे. सर्व व्यवस्थापने व शाळा या तपासाकरिता सहकार्य करणारच आहेत मात्र या कामी आपलेही सहकार्य मिळणे अपेक्षित आहे. अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खाजगी व्यवस्थापनानेचा नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, वैयक्तिक मान्यता आदेश व 2016 नंतर शालार्थ आयडी आदेश प्रत ज्यामध्ये जावक नंबर व दिनांक असणे आवश्यक आहेत. सदरचे अभिलेख डिजिटलाईज करण्याची कार्यवाही 30 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण करण्याची आहे. तसेच या कालावधीत श्री गणेशोत्सव हा राज्य उत्सव दि.27 ऑगस्ट ते 06 सप्टेंबर या कालावधीत साजरा होत आहे. या कालावधीत शाळेला सुट्टी आहे. अभिलेख डिजिटलाईज करण्यासाठी दिलेल्या मुदतीत अनेक सण उत्सव व सुट्ट्या येत आहेत. काही शाळांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संस्था जास्त आहेत. त्यामुळे कामकाज पूर्ण करण्यासाठी विलंब लागत आहे. तसेच या कामाकरिता संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षित नसल्याने कागदपत्रे पीडीएफ बनवून अपलोड करण्यास विलंब लागत आहे. त्यामुळे कर्मचारी अभिलेख डिजिटलाईज करण्यास दि.30 सप्टेंबर 2025 रोजी पर्यंत मुदत वाढ मिळावी अशी मागणी शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त यांना शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी केली आहे.

तसेच पूर्वी काही व्यवस्थापने नियुक्ती आदेश संबंधित कर्मचाऱ्यास देत नसत किंवा काही वेळेस जावक क्रमांक सारख्या बाबी गांभीर्याने घेतल्या जात नसत त्यामुळे 2012 पूर्वीच्या कर्मचाऱ्यांचे अभिलेख मागणीप्रमाणे उपलब्ध नाहीत. याकरिता सेवा पुस्तिकेचे पहिले पान ग्राह्य धरावे, रुजू अहवाल ही त्याच्याच आधारे विद्यमान मुख्याध्यापक यांनी पडताळणी करून तयार करून द्यावा यास मान्यता मिळावी. नैसर्गिक आपत्तीमुळे शालेय दप्तर नष्ट झालेल्या शाळांमधील कर्मचाऱ्यांची पर्यायी कागदपत्रे स्वीकारावी. दि. 2012 पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना यातून वगळावे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता प्रस्तावासाठी ऑनलाइन प्रणाली सुरू करावी. त्रुटींची पुरता देखील ऑनलाइन प्रणालीद्वारेच करावी अशा मागण्या निवेदनात केल्या आहेत.


वेतन बिल स्विकारले नाही तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कर्जाच्या हप्त्यात तक्तात ज्यामुळे दंड, व्याज तर भरावाच लागतो त्याचबरोबर सिव्हिल्स स्कोर ही खराब होतो. काहिंना घर चालवणे तर काहींना वैद्यकीय उपचार घेणे असहय होऊन जाते.या सर्व बाबींचा विचार करून अभिलेख डिजिटलाईज करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा असे सुधीर घागस यांनी नियोजनात म्हटले आहे.

## वाशिंद परिसरात पावसाची जोरदार हजेरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिद : वाशिंद परीसरात पाऊस धुवाधार पडत असल्याने सर्वत्र पाणीच पाणी दिसून येत आहे.

गेले दोन दिवस पावसाची धोधो सर सुरू असल्याने वाशिंद परीसरातील नद्या ओसडून वाहात आहेत. सतत पडणा-या पावसामुळे शेतातील भात पिकात पाणीच पाणी झाल्याने भात पिक कुजण्याच्या भितीने शेतकरी राजा चिंत्तेत सापडला आहे. गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या 10 दिवसावर आल्याने बनविलेल्या गणपती बाप्पाच्या मुर्ती ओल्या राहात असल्याने कलर कामात अडथळा येत असल्याने कारागिरही चिंत्तेत असल्याचे दिसून येत आहे.चाकरमानींना सतत पडणा-या पावसामुळे कामावर जाण्यास अडथळा होत असल्याने लेट मार्क लागण्याची भितीने कामगार त्रस्त करत आहे.



पावसामुळे झाले पाणीच पाणी.

गणपत्ती बाप्पाच्या सजावटीसाठी लागणा-या साहित्यांनी बाजार पेठा सजल्या असल्यातरी पावसामुळे ग्राहक घराबाहेर पडत नसल्याने दुकानदार ग्राहकांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.- नंदकिशोर मलबारी.

### देखभाल दुरुस्तीसाठी
## उल्हासनगर आणि ठाणे मनपा क्षेत्रात पाणीपुरवठा बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाने (Midc) जांभुळ जलशुध्दीकरण केंद्रातील जलाशय (Hsr) येथे बारवी गुरुत्ववाहिनी क्र.१, २ व ३ वर वाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीचे देखभालीचे काम हाती घ्यावयाचे असल्याने गुरुवार दिनांक २१/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपासुन ते शुक्रवार दिनांक २२/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत (२४ तास) उल्हासनगर महानगरपालिकेला होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

तरी उल्हासनगर कॅम्प नं. ४, ५ व ३ च्या काही भागात वरील नमुद वेळेत पाणी पुरवठा बंद राहील. तद्नंतर दिनांक २३/०८/२०२५ रोजी कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होण्याची शक्यता असल्याने, नागरीकांना अवाहन करण्यात येते कि, "पाण्याचा गैरवापर टाळावा आणि पाणी जपुन वापरावे" व महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता अशोक घुले यांनी केले आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रात देखभाल दुरूस्तीचे अत्यंत महत्वाचे काम हाती घेण्यात येणार आहे. परिणामी गुरूवार दिनांक 21/08/2025 रोजी दुपारी 12.00 वाजल्यापासून ते शुक्रवार दिनांक 22/08/2025 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत ठाण्यातील काही भागात एकूण 24 तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

या शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिका अंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. 26 व 31चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागांमध्ये तसेच वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. 2, नेहरुनगर, मानपाडा प्रभागसमितीअंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा 24 तासांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी. तसेच पाणीकपातीच्या कालावधीत पाण्याचा वापर काटकसरीने करून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात आले आहे.

## विधी फाऊंडेशनच्या वतीने रक्तदान शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील अंबाडी नाका येथे " विधी फाऊंडेशन " च्या वतीने रविवार दिनांक-17/08/2025 रोजी " "ज्ञानेश्वर मंदीर झिडके-अंबाडी नाका" येथे सकाळी 9.30 ते दुपारी 3.00 या वेळेत " स्वेच्छा रक्तदान शिबीर " आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात एकूण-90 रक्तदात्यांनी आपली सामाजिक जाणीव ठेवून स्वेच्छेने रक्तदान केले आहे. या शिबिरात ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचे डॉ.चौधरी व त्यांचा कर्मचारीवर्ग सहभागी झाले होते,व सदर एकूण रक्तदान राष्ट्रीय कार्यास हातभार म्हणून ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांच्याकडे गरजुंच्या साठी " विधी फाऊंडेशन यांच्याकडून सुपूर्द करण्यात आल्याचे फाऊंडेशनचे संस्थापक / अध्यक्ष समीर ठाकरे यांनी वृत्तप्रतिनिधी यांना सांगितले.



दिवंगत- विधी समीर ठाकरे हिचे वयाच्या अवघ्या 6 व्या वर्षी निधन झाले आहे,या दुःखद घटनेची तीव्रता अद्यापही आईवडील विसरू शकत नाहीत,परंतु जनमानसात आपल्या मुलीचे नाव सामाजिक क्षेत्रात अजरामर राहावे,या भावनेतून आईवडील "सृष्टी समीर ठाकरे" यांनी आपल्या दिवंगत मुलीच्या नावाने "विधी फाऊंडेशन" या संस्थेची स्थापना करून झिडके-अंबाडी सारख्या ग्रामीण भागात सामाजिक उपक्रमाद्वारे गरीब व गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य पुरविणे तसेच आजारपणात रक्तदानाची गरज असणाऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने गेल्या तीन वर्षांपासून स्वेच्छा रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

या शिबिरास शुभेच्छा देणाऱ्या मान्यवरांमध्ये खासदार- डॉ.हेमंत सवरा,आमदार- शांताराम मोरे,सामाजिक कार्यकर्ते- डॉ. राजूभाऊ चौधरी तसेच परिसरातील अनेक कार्यकर्त्यांची आवर्जुन उपस्थिती होती.

अशा प्रकारे विधी फाऊंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमामुळे जनमानसात अभिनंदन केले जात आहेत.

## पडघ्यात श्रीकृष्ण जयंतीनिमित्त मिरवणूक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन 2025 मध्ये शालार्थआयडी देताना गैरप्रकार आढळून आल्याबाबतच्या तक्रारी शासनास निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित करून त्रीसदस्यीय विशेष चौकशी पथक स्थापन केले. त्यानुसार 2012 ते आज पर्यंतच्या नियुक्त व मान्यता प्रकारांची चौकशी करावयाची आहे. सर्व व्यवस्थापने व शाळा या तपासाकरिता सहकार्य करणारच आहेत मात्र या कामी आपलेही सहकार्य मिळणे अपेक्षित आहे. अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खाजगी व्यवस्थापनानेचा नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, वैयक्तिक मान्यता आदेश व 2016 नंतर शालार्थ आयडी आदेश प्रत ज्यामध्ये जावक नंबर व दिनांक असणे आवश्यक आहेत. सदरचे अभिलेख डिजिटलाईज करण्याची कार्यवाही 30 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण करण्याची आहे. तसेच या कालावधीत श्री गणेशोत्सव हा राज्य उत्सव दि.27 ऑगस्ट ते 06 सप्टेंबर या कालावधीत साजरा होत आहे. या कालावधीत शाळेला सुट्टी आहे. अभिलेख डिजिटलाईज करण्यासाठी दिलेल्या मुदतीत अनेक सण उत्सव व सुट्टया येत आहेत. काही शाळांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संस्था जास्त आहेत. त्यामुळे कामकाज पूर्ण करण्यासाठी विलंब लागत आहे. तसेच या कामाकरिता संबंधित कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षित नसल्याने कागदपत्रे पीडीएफ बनवून अपलोड करण्यास विलंब लागत आहे. त्यामुळे कर्मचारी अभिलेख डिजिटलाईज करण्यास दि.30 सप्टेंबर 2025 रोजी पर्यंत मुदत वाढ मिळावी अशी मागणी शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त यांना शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी केली आहे.

तसेच पूर्वी काही व्यवस्थापने नियुक्ती आदेश संबंधित कर्मचाऱ्यास देत नसत किंवा काही वेळेस जावक क्रमांक सारख्या बाबी गांभीर्याने घेतल्या जात नसत त्यामुळे 2012 पूर्वीच्या कर्मचाऱ्यांचे अभिलेख मागणीप्रमाणे उपलब्ध नाहीत. याकरिता सेवा पुस्तिकेचे पहिले पान ग्राह्य धरावे, रुजू अहवाल ही त्याच्याच आधारे विद्यमान मुख्याध्यापक यांनी पडताळणी करून तयार करून द्यावा यास मान्यता मिळावी. नैसर्गिक आपत्तीमुळे शालेय दप्तर नष्ट झालेल्या शाळांमधील कर्मचाऱ्यांची पर्यायी कागदपत्रे स्वीकारावी. दि. 2012 पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना यातून वगळावे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता प्रस्तावासाठी ऑनलाइन प्रणाली सुरू करावी. त्रुटींची पुरता देखील ऑनलाइन प्रणालीद्वारेच करावी अशा मागण्या निवेदनात केल्या आहेत.

वेतन बिल स्विकारले नाही तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कर्जाच्या हप्त्यात तक्तात ज्यामुळे दंड, व्याज तर भरावाच लागतो त्याचबरोबर सिव्हिल्स स्कोर ही खराब होतो. काहिंना घर चालवणे तर काहींना वैद्यकीय उपचार घेणे असहय होऊन जाते.या सर्व बाबींचा विचार करून अभिलेख डिजिटलाईज करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा असे सुधीर घागस यांनी नियोजनात म्हटले आहे.

## जुन्नर तालुक्यातील घोलवड येथे संगणक शाळेचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जुन्नर : स्वतंत्र भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन शिवनेरी विद्यालय धोलवड ता. जुन्नर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ग्रामशिक्षण सेवा मंडळाचे अध्यक्ष भालचंद्र नलावडे यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला. राष्ट्रगीताच्या गजरात संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारावून गेले.

या विशेष दिवशी विद्यालयाला एक अनमोल अशी भेट लाभली. अत्याधुनिक संगणक शाळेचे उद्घाटन समाजसेविका मंदाकिनी रभाजी वामन व युवा उद्योजक नितीन रभाजी वामन यांच्या हस्ते संपन्न झाले. याबाबतची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांनी दिली.



मुख्याध्यापक समीर वामन यांच्या प्रयत्नातून काळवाडी येथील युवा उद्योजक सचिन वामन यांनी आपल्या दातृत्वातून ही संगणक शाळा उभारून दिली आहे. विज्ञानयुगात संगणक शिक्षण ही काळाची गरज असून पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे.

"या संगणक शाळेमुळे विद्यार्थी संगणक साक्षर होऊन देशाचे सुजाण नागरिक घडतील," असे प्रतिपादन अध्यक्ष भालचंद्र नलावडे यांनी आपल्या भाषणात केले.

कार्यक्रमाला ग्रामशिक्षण सेवा मंडळाचे उपाध्यक्ष बाबाजी मुंढे, सरपंच वैभव नलावडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश नलावडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गुलाब पा. नलावडे, तसेच मंदाकिनी वामन, उद्योजक नितीन वामन आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय अनेक पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या अनोख्या सोहळ्याला उपस्थित राहिले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपशिक्षक आर. एस. गोसावी, बी. एच. वेडे, एस. व्ही. शिवशरण, एस. पी. कानडे, एस. व्ही. पानसरे, एस. के. करपे, मयुरी तांबे व एस. वाय. जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एच. वेडे यांनी करून वातावरण अधिक रंगतदार केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाच्या ज्ञानाचे दालन खुले करणारी ही संगणक शाळा भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी मोलाची ठरणार आहे.

## आजचे राशि भविष्य



**मेष**

भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**

तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला उपयुक्त ठरेल. आपण कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**

तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील. काही नवीन कल्पनांवरही काम कराल.

**कर्क**

तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल, लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. काळ अनुकूल आहे, परंतु तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**

सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**

आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते.दिवस चांगला असेल.

**तूळ**

मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील. विरोधी पक्ष तुमच्यापुढे झुकेल आणि तुमचे सोशल नेटवर्क मजबूत होईल.

**वृश्चिक**

तुम्ही आज मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**

कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत बदल होईल.

**मकर**


बालपणीचा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून आनंद होईल.मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता. मुलांशी वाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ**

आज तुमच्या दिनचर्येत काही बदल होईल. आज तुम्ही जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो.

**मीन**

विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहात, तुमचा सन्मान होईल. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.




# मिरा-भाईदर मधील सार्वजनिक उत्सवांच्या परवानग्या ऑनलाइन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. १८**

गणेशोत्सवासह पुढे येणाऱ्या सर्व सार्वजनिक उत्सवांना लागणाऱ्या परवानग्या आता महापालिकेकडून ऑनलाइन दिल्या जाणार आहेत. महापालिकेच्या १० सेवा नुकत्याच ऑनलाइन सुरू झाल्या आहेत. त्यात उत्सव परवानगीचादेखील समावेश आहे. या सेवांच्या ऑनलाइन परवानगीचे नुकतेच आयुक्तांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

महापालिकेने नागरिकांशी संबंधित ५२ सेवा ऑनलाइन यापूर्वीच उपलब्ध केल्या आहेत. त्यात आता आणखी १० सेवांची भर पडली आहे. त्यात गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाशिवाय अन्य सार्वजनिक उत्सव व सणांसाठी महापालिकेकडून घ्याव्या लागणाऱ्या परवानगींचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक मंडळांना मंडप व अन्य परवानग्या आता ऑनलाइनही दिल्या जाणार आहेत. महापालिकेच्या संकेतस्थळावर उत्सव परवानगी एका क्लिक केल्यानंतर त्या ठिकाणी परवानगी घेणाऱ्याने आपली नोंदणी करायची आहे. त्यानंतर उपलब्ध होणारा अर्ज भरून तो अपलोड केला की उत्सवाची परवानगी दिली जाणार आहे. ही परवानगी घेताना अग्निशमन व पोलिसांचा ना हरकत अर्जासोबत जोडणे आवश्यक असणार आहे.

### अन्य सेवांसाठीच्या परवानग्यादेखील आता ऑनलाइन

महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिल्या जाणाऱ्या अन्य सेवांसाठीच्या परवानग्यादेखील आता ऑनलाइन घेता येणार आहेत. त्यात प्रामुख्याने शहरात सुरू असलेल्या विकासकामांच्या पूर्णत्वाचा दाखला, विकासकामांचा प्रमाणानुसार तपशील, भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी परवानगी, गटारे व पदपथ यावर खासगी संस्थांतर्फे टाकण्यात येणाऱ्या स्लॅबसाठी परवानगी, तसेच स्वखचनि गटारे, रस्ते बांधण्यासाठी परवानगी, सार्वजनिक भागातून जाणाऱ्या रस्त्यासाठी परवानगी, गटारांवर झाकणे टाकण्यासाठी, खड्डे दुरुस्तीसाठी व रस्ता खोदकाम करण्यासाठीच्या परवानग्यांचा यात समावेश आहे.

# कल्याण-डोंबिवलीत पावसाचे धुमशान

## पालिका हद्दीतील सर्व शाळांना आज सुट्टी जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईत सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालेलं आहे. रस्ते, नाले दुतर्फा भरुन वाहत आहेत, रस्त्याने चालणंदेखील अवघड झालेलं आहे. त्यामुळे उद्या मुंबईत शाळांना सुट्टी आहे का? असा प्रश्न पालकांना पडला आहे. त्याचं कारण ठाण्यामध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे.

गेल्या दोन तीन दिवसांपासून कल्याण डोंबिवलीसह ग्रामीण भागात पावसाची संततधार सुरू आहे. पावसाच्या संततधारेमुळे बाजारपेठांमधील रहदारी थंडावली असून हवेत गारवा निर्माण झाला आहे. सोमवारी सकाळपासून पावसाचा जोर काहीसा जास्त असल्याने अनेक शाळा सोडून देण्यात आल्या, तर दुपारच्या सत्रांना सुट्टी जाहीर करण्यात आली. यामुळे विद्यार्थी आनंदीत झाले आहेत. रस्त्यांवरील खड्डे आणि साचलेल्या पाण्यामुळे तसेच मुंबईत पावसाचा जोर जास्त असल्याने चाकरमानी अडकून पडतात. यामुळे काही चाकरमान्यांनी आज घरीच रहाणे पसंत केले.

शनिवार पासून कल्याण डोंबिवलीत पावसाची संततधार सुरु आहे. गोकुळाष्टमीची सुट्टी असल्याने शनिवारी व रविवारी सुट्टीच्या दिवशी पावसाचा फारसा परिणाम नागरिकांना जाणवला नाही. सोमवारी सकाळ पासूनच पावसाच्या जोरदार सरी शहरात बरसत आहेत.

पावसाचा जोर फारसा नसल्याने चाकरमानी कामावर जाण्यासाठी निघाले तसेच सकाळच्या सत्रातील शाळा देखील नेहमी प्रमाणे भरल्या. मात्र 12 च्या दरम्यान पावसाचा जोर वाढण्यास सुरुवात झाली. शाळा प्रशासनाने देखील दुपारच्या सत्रातील शाळांना सुट्टी जाहीर केली.

डोंबिवलीत मानपाडा, टिळकपथ, एमआयडीसी पश्चिमेला महात्मा फुले रोड, सुभाष रोड, दीनदयाळ रोड यांसह कोपर आणि कुंभारखान पाडा आदी भागात वाहतूक मंदावली होती. सुभाष रस्त्यावर खड्डे असल्याने रिक्षा वाहतूक आणि दुचाकींची अडचण झाली होती, नागरिकांना त्याचा खूप त्रास झाला. ठीकठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे डबके झाल्याने वाहनांना खड्याचा अंदाज आला नाही, त्यामुळेही विद्यार्थी, आबाल-वृद्धांना मार्ग काढताना त्रास झाला. बाजारपेठ मध्ये ही शुकशुकाट पसरला होता.

# कर्जत तालुक्यातील धरणांच्या निविदांवर शेतकऱ्यांचा संताप


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कर्जत, ता. १८**

कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवरील बोरगाव येथील प्रस्तावित पोशीर धरण आणि चिल्लार नदीवरील शिलार धरण या दोन मोठ्या प्रकल्पांसाठी शासनाने नुकत्याच निविदा जाहीर केल्या, मात्र या निविदा जाहीर होताच शेतकरीवर्गामध्ये तीव्र नाराजी पसरली असून, संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत. गेल्या तीन दशकांपासून पोशीर धरणाविरोधात स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ सातत्याने आंदोलन करत आहेत. या धरणामुळे बोरगाव, चई, चेवणे, उंबरखांड, भोपळेवाडी, पेंढरी आणि बोन्डेशेत या गावांतील शेकडो कुटुंबे विस्थापित होणार आहेत, तर शिलार धरणामुळे पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील शिलार, धोत्रे व धोत्रेवाडी गावांवर थेट परिणाम होणार आहे. नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी हे प्रकल्प हाती घेतले जात असल्याचे शासनाचे म्हणणे आहे. यासाठी पोशीर धरणासाठी ६, ३९४ कोटी व शिलार धरणासाठी ४, ८६९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. कोकण पाटबंधारे महामंडळाने स्वतंत्रपणे पोशीर धरणासाठी २,१३५ कोटी व शिलार धरणासाठी १, ६६७ कोटींच्या निविदा काढल्या आहेत, परंतु या प्रकल्पांची पर्यावरण व हवामान बदल सुनावणी अद्याप झाली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे, शिवाय जमिनीचे संपादन प्रक्रियाही सुरू झालेली नाही. तरीही शासनाने घाईघाईने निविदा काढल्याने संताप उसळला आहे.

# खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीला यश ठाणे महापालिकेकडून उत्सव मंडळांना भाडे माफ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे, ता. १८ :** गणेशोत्सवाला मोठी परंपरा, तर नवरात्रोत्सवाला धार्मिक महत्त्व आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे जनजागृतीचे मोठे कार्य करत असतात. राष्ट्रभक्तीची भावना जागृत करणाऱ्या या सार्वजनिक मंडळांना रस्ते किंवा पदपथावर गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात तात्पुरता मंडप उभारण्याची परवानगी द्यावी, तसेच त्यासाठी कोणतेही मंडप भाडे आकारले जाऊ नये, अशी विनंती खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे महापालिका प्रशासनाकडे केली होती. खासदार नरेश म्हस्के यांच्या विनंतीला मान देत ठाणे महापालिका प्रशासनाने दोन्ही सणांना मंडळांकडून भाडे न आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मंडळांना दिलासा मिळाला आहे.

दरवर्षी असंख्य गणेश मंडळे आणि नवरात्रोत्सव मंडळे आपापल्या परिसरात उत्साहात, भक्तिभावाने आणि प्रेमाने हा सोहळा साजरा करतात. ही मंडळे फक्त उत्सवापुरती मर्यादित नसतात, तर वर्षभर विविध लोकोपयोगी उपक्रम, समाजसेवा, रक्तदान शिबिरे, पर्यावरण जनजागृती आणि नागरिकांसाठी उपयुक्त कार्यक्रम आयोजित करत असतात. या मंडळांचा सहभाग महापालिकेच्या विविध उपक्रमांतही मोलाचा असतो. ही मंडळे ज्या मर्यादित निधीतून इतका मोठा उत्सव साजरा करतात, त्यामागे प्रचंड मेहनत, वेळ आणि नागरिकांच्या वर्गणीच्या रूपात मिळालेला थोडासा निधी असतो, पण त्या निधीतूनच मंडप भाडे, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम, सुरक्षा आणि इतर खर्च भागवणे अनेकदा कठीण जाते.

ज्या मंडळांनी वर्षभर समाजासाठी योगदान दिले, त्यांना महापालिकेनेही आर्थिक दिलासा द्यावा, यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे महापालिका आयुक्तांना गणेशोत्सव व नवरात्रोत्सवासाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळांना मंडप भाडे पूर्णपणे माफ करण्याची विनंती करणारे पत्र लिहिले होते. खासदार नरेश म्हस्के यांच्या पत्रावर आयुक्तांच्या परवानगीने ठाणे महापालिकेने आता गणेशोत्सव व नवरात्रोत्सवासाठी ठाण्यातील सर्व सार्वजनिक मंडळांना रस्ते किंवा पदपथावर तात्पुरता मंडप उभारण्याची परवानगी आणि त्यासाठी कोणतेही मंडप भाडे आकारले जाणार नसल्याचा असा निर्णय घेतला आहे. तसे लेखी आदेशही दिले आहेत.

# रायगड जिल्ह्यात धान्य वाटपाचा गोंधळ

## ऐन सणासुदीच्या काळात रेशनधान्याचा तुटवडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. १८ :**

पावसाळ्यात रेशनधान्य आणण्यासाठी जाता येत नसल्याने राज्य शासनाने तीन महिन्यांचे धान्य जूनमध्येच वितरित केले होते, पण जिल्ह्यातील रेशनधान्याचा साठा आता संपला. अशातच यंदा आनंदाचा शिधापण दिला जाणार नसल्याने ऐन गौरी-गणपतीच्या सणातच गोरगरिबांची आबाळ होणार असल्याचे चित्र आहे. दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना १०० रुपयांत सणानिमित्ताने आनंदाचा शिधा वितरित केला जातो. या शिधामध्ये रवा, साखर, चणाडाळ, पामतेल, मैदा अशा पाच जिनसा दिल्या जातात. कोकणात गौरी-गणपतीच्या सण महत्त्वाचा असल्याने तीन वर्षांपासून आनंदाच्या शिधा किटचे वाटप केले जाते. येथील गोरगरीब कुटुंबीय किटच्या वितरणाची वाट पाहात असतात; परंतु शिधा वाटप केला जाणार नसल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाकडून दिली जात आहे. ऑगस्टमध्ये मोफत शिधा मिळणार नाही. जुलै, ऑगस्टचा मोफत शिधा जुनमध्ये वाटण्यात आलेला आहे. त्यामुळे रेशनिंगचे स्वस्त धान्य मिळणार नसल्याने गोरगरिबांची सणासुदीला गैरसोय होणार आहे.




### धान्यवाटपात सावळा गोंधळ

**तीन महिन्यांचा एकत्र शिधावाटपाची जिल्ह्यात पुरेशी यंत्रणा नाही. धान्य एकत्र साठवण्याची गोदामांची कमतरता, वाहतुकीसाठी अपुरी वाहने, दुकानांमध्ये धान्य साठवण्यासाठी अपुरी जागा अशा विविध समस्यांमुळे धान्यवाटपात गोंधळ उडाला होता. १३ जूनपर्यंत १५.२ टक्के वितरण झाले होते. ऑगस्टपर्यंत फारशी सुधारणा झाली नव्हती. तरीही १०० टक्के वितरण झाल्याचा दावा पुरवठा विभाग करत आहे, पण पुरवठा विभागाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना बसत आहे.**

### 66 पैकी 21 गोदामे सुस्थितीत

जिल्ह्यात १,४५२ रेशनधान्य दुकाने आहेत. कमीत कमी जागेतील या दुकानांमध्ये साठवणुकीची सुविधा नाही. १० बाय १० फुटांच्या दुकानातच धान्यविक्री करतात. अशा परिस्थितीत तीन महिन्यांचे धान्य साठवून ठेवणे, शक्य होत नाही. काही दुकाने जीर्ण इमारतीमध्ये असल्याने पावसाळ्यात गळती लागून धान्य खराब होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे दुकानदार धोका पत्करण्यास तयार नाहीत. पुरवठा विभागाची जिल्ह्यात ६६ गोडाऊन आहेत, परंतु त्यापैकी फक्त २१ गोदामे सध्या सुस्थितीत आहेत.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे ज्येष्ठ नागरिक व कृतज्ञता संवाद दिनाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. १८**

पालिकेमार्फत ज्येष्ठ नागरिक आणि कृतज्ञता संवाददिन गुरुवारी (ता. २१) साजरा करण्यात येणार आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे हा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी आणि प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराने होईल. त्यानंतर २१ ऑगस्ट हा अल्झायमरदिन असल्याने तज्ज्ञ डॉक्टर्स यांचे अल्झायमरविषयक मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठांना आवश्यक असलेल्या कायदेविषयक सल्ला, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती यावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अलीकडच्या काळात ज्येष्ठ नागरिकांवर वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर, पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी सायबर फसवणुकीपासून बचावासाठी मार्गदर्शन व प्रश्नोत्तर सत्र घेणार आहेत. ज्येष्ठ नागरिकदिनाचे औचित्य साधून दोन महिला व दोन पुरुष ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला जाणार आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, तर गुणदर्शन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी बुधवार (ता. २०) पर्यंत मोबाईल क्रमांकांवर ७७१५८१५१२७/९३२१६७०७६९ नावनोंदणी करावी, असे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# मुंबई-अहमदाबाद महामार्ग पाण्याखाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** सोमवारी सकाळपासून कोसळत असलेल्या पावसामुळे मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सगनई नाक्याजवळ पाणी साचले आहे. यामुळे रस्त्यावरील माती वाहून गेली असून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. मिरा-भाईंदर शहरात मागील तीन दिवसांपासून पाऊस सुरू आहे. मात्र, सोमवारी सकाळपासून पावसाने चांगलाच जोर धरला आहे. त्यामुळे घोडबंदर घाट मार्गावर डोंगरावरून वाहून येणारे पाणी रस्त्यावर आल्याने वाहतूक ठप्प झाली. दुपारनंतर मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील सगनई नाका (दिल्ली दरबार हॉटेलजवळ) येथेही पाणी साचल्याचे समोर आले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील डोंगर उतारावरून हे पाणी रस्त्यावर येत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, या मार्गावर सध्या नव्या उड्डाणपुलाचे काम सुरू असल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यात पावसाचे पाणी जोरात वाहत असल्याने रस्त्यावरील रेती वाहून जात आहे आणि रस्ता खचू लागला आहे. परिणामी, अरुंद मार्गावरूनच वाहतूक सुरू आहे. त्यामुळे प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे.

# मतदान प्रक्रियेसाठी वारकरी भवन निवडणूक आयोगाच्या ताब्यात

## ऐनवेळी सभागृह नोंदणी रद्द झाल्याने नागरिकांची धावपळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी ता. १८ (बातमीदार)**

निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी बेलापूरमधील महापालिकेच्या वारकरी भवन इमारतीचा ताबा आताच घेतला आहे. यामुळे इमारतीमध्ये नागरिकांची सभागृह नोंदणी ऐनवेळी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे सभागृहाचे बुकिंग केलेल्या नागरिकांना आता इतर ठिकाणी धावाधाव करावी लागत आहे.

बेलापूरमध्ये महापालिकेच्या वतीने वारकरी भवनाची इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीमध्ये असलेले सभागृह धार्मिक, सामाजिक वैयक्तिक कामांसाठी भाड्याने दिले जाते. त्यानुसार येथे आगाऊ बुकिंग केले जाते. यावेळीही काहींनी या सभागृहाचे बुकिंग केले आहे, मात्र आठवड्यापूर्वीच निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेच्या कामासाठी हे वारकरी भवन ताब्यात घेतले आहे. ऐन वेळी बुकिंग रद्द झाल्याने दुसरी जागा शोधणे कठीण होत असल्याचे नागरिक सांगत आहेत, मात्र निवडणूक आयोगाच्या पुढे काही चालत नसल्याने दुसरी जागा शोधावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक प्रक्रिया या भवनातूनच राबवली जाणार असून, ईव्हीएम मशीन इथेच ठेवली जाणार आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक वापरासाठी सभागृह आणि भवन बंद करण्यात आले आहे. भवनाभोवती पत्रे लावून ते संरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे या भवनातील सभागृहाचे बुकिंग केलेल्या नागरिकांना आता दुसरी जागा शोधावी लागत आहे.


# सार्वजनिक बांधकाम खाते झोपेत?

## वाहतूक पोलीस बुजवताहेत रस्त्यांवरील खड्डे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबईः सालाबाद प्रमाणे पावसाळ्या पूर्वी कामे करून लाखोंचा निधी खर्च करूनही या वर्षीही शीव पनवेल मार्गावर मोठं मोठे खड्डे खास करून उड्डाणपुलावर पडले आहेत. याच खड्डयामुळे रविवारी रात्री प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. शेवटी वाहतूक पोलिसांनी बेलापूर खिंडीतील उड्डाणपुलावरील खड्डे बुजवले आणि त्या नंतर हळू हळू वाहतूक कोंडी सुटून रस्ता सुरळीत झाला.

केवळ नवी मुंबईतीलच नव्हे तर राज्यातील सर्वाधिक वर्दळ पैकी असणारा मार्ग म्हणून शीव पनवेल महामार्ग समजला जातो. राज्याची राजधानी मुंबईला राज्याशी जोडणारा मार्ग म्हणून या मार्गाची ओळख आहे. शीव पासून पनवेल पर्यंत असा २५ किलोमीटरचा हा मार्ग असून यातील १२ किलोमीटरचा मार्ग हा नवी मुंबई आणि पनवेल भागात आहे. या ठिकाणी ८ उड्डाणपूल आहेत. या मार्गावर सिमेंट कॉंक्रीटीकरण झाले असले तरी उड्डाणपुलावर मात्र बहुतांश ठिकाणी डांबरी करण आहे. त्यामुळे पावसाळयात मोठं मोठी खड्डे पडतात.



याच कारणाने पावसाळयापूर्वी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करून दुरुस्ती केली जाते. मात्र पावसामुळे पुन्हा खड्डे पडून निधी वाहून जातो. याच कारणाने गेली कित्येक वर्ष सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या कामाच्या दर्जा बाबत शंका उपस्थित केली जाते.

या वर्षीयी खिंडीतील उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. रात्रीच्या वेळी प्रवासी बस माल वाहतूक जड अवजड वाहने आणि प्रवासी हलकी वाहने यांची संख्या प्रचंड असते त्यात खिंडीतील उड्डाण पुलावर खड्डे पडल्याने रविवारी रात्री वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीमुळे सुमारे पाच किलोमीटर पर्यंत दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांचे कर्मचारी वाहतूक हवालदार जीतू पाटील आणि हवालदार आकाश करपे यांनी स्वतःहून पुढाकार घेतला. त्यांनी खडी व राडारोडा ओळखीतून उपलब्ध करीत उड्डाणपुलावरील खड्डे बुजवले. त्यांच्या या कृतीमुळे वाहतूक कोंडीतुन वाहनांची सुटका झाली आणि प्रवाशांचा त्रास कमी झाला. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिक्रिया मिळू शकली नाही यापूर्वी हि ठाणे बेलापूर मार्गावर रबाळे उड्डाणपुलावर अशीच स्थिती निर्माण झाली होती. त्या वेळीही वाहतूक हवालदार सुनील नरळे आणि स्वप्नील काशीद यांनी स्वतः फावडे हातात घेऊन खड्डे बुजवले होते.



# पालघर नगरपरिषदेची प्रभाग रचना जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर नगर परिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भौगोलिक सीमांसह प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली असून याविषयी ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आली असून नगर परिषद क्षेत्रामधून ३० सदस्यांना निवडून द्यावयाचे आहे. शहरातील ६८ हजार ९३० लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीचे ३४१९ तर अनुसूचित जमातीची ९७२० लोकसंख्या असल्याचे दिसून आले आहे.

नगर परिषदेत दोन सदस्य असणारे १५ प्रभागाची रचना करण्यात आली असून प्रभाग रचना करताना ४५९५ लोकसंख्या अनुसरून प्रारूप प्रभाग रचना करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. नगरपरिषदेमधील नियोजित प्रभागांमध्ये किमान ४१३५ ते कमाल ५०५५ लोकसंख्येच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आल्याची माहिती नगरपरिषदेने प्रसिद्ध केली आहे.



## योगीधाम को-ऑप हौसिंग सोसायटी असोसिएशनच्या वतीने धडक मोर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : आपल्या विविध मागण्यासाठी योगीधाम को-ऑप हौसिंग सोसायटिस असोसिएशन ली. वतीने विविध मागण्यांसाठी विकासकाच्या मोर्चा काढण्यात आला. योगीधाम परिसरात योगी डेव्हलपर यांनी २७ इमारती बनविलेल्या असून त्यात जवळपास २२०० सदनिका आहेत. विकासकाने सदनिका विक्री करते वेळी प्रत्येक सदनिका धारकांकडून १५ हजार ते २५ हजार रक्कम क्लब हाऊसचे आजीवन सभासद फी या नावे घेतली आहे. योगीधाम असोसिएशनची मागणी आहे की क्लब हाऊस हस्तांतरित करताना हि आजीवन सभासद फी देखील हस्तांतरित करावी व क्लब हाऊस चे नूतनीकरण करून द्यावे.

या मागण्यांसाठी असोसिएशनने विकासकाकडे वारंवार पत्रव्यवहार केला परंतु संचालक भेट देखील देण्यास तयार नाहीत. आठ दिवसात संचालकांनी आमच्या मागण्याविषयी चर्चा करण्यासाठी मिटिंग आयोजित न केल्यास उपोषण करण्यात येईल अशी माहिती असोसिएशनचे पदाधिकारी प्रमोद गायकवाड, नितीन जाधव, उमेश वाघ यांनी प्रसार माध्यमांना दिली. शांती मोर्चाच्या आयोजनासाठी ओसिएशनचे पदाधिकारी प्रमोद गायकवाड, नितीन जाधव, उमेश वाघ, एन.डी.देशमुख, संदीपकुमार अंत्रे, अतुल सरगर, अनिल जगताप, चेतन निकम, जितेंद्र सावंत, तारा यादव यांनी परिश्रम घेतले. मोर्चा यशस्वीतेसाठी दिनकर कांबळे, दिलीप कनोजिया, दिलीप गांगुर्डे, वैशाली गरुड, दिलीप सोनावणे, सूर्यकांत ढोके, ललित घाटकर, रुपेश सावंत, तारकेश शुक्ल, संजय लाटकर, निलेश कांबळे, लिगेरो फेर्नांडीस, अशोक पुजारी, एकनाथ लब्दे, आंगणे, परब, भोसले, अशोक दळवी, राजेशवाकोडे, खत्री, विजय गुसेन, वायकर, संदीप लोहकरे, योगेश बाविस्कर, अनिल छाप्रू, व इतर सर्व पदाधिकारी यांनी विशेष सहकार्य केले.

## धसई महावितरण कार्यालयावर ग्राहकांचा धडक मोर्चा!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तालुक्यातील धसई विज वितरण मंडळाच्या ढिसाळ व अनागोंदी कारभारा बाबत तसेच सातत्याने विज पुरवठा खंडित प्रकारांनी नागरीक हैराण झाले होते म्हणून विज मंडळाच्या कारभारा विरोधात माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष (आप्पा) घरत यांच्या नेतृत्वाखाली धसई बाजारपेठतुन हजारोंच्या संख्येने हातात काळे झेंडे घेऊन निषेधाच्या घोषणा देत मोर्चा काढला यावेळी विद्युत मंडळाच्या गलथान कारभाराचा खरपूस समाचार घेताना सुभाष आप्पा घरत म्हणाले की करोडो रुपये आदिवासी बांधवांसाठी खर्च केल्याचे सांगितले जाते मात्र अजुनही धसई जवळील कोळोशी आदिवासी वस्ती पर्यंत विज पोहचली नसुन संबंधित आदिवासी वाडीतील नागरिक चार्जिंग बल्प दुसऱ्या गाव मधुन चार्जिंग करुन त्या प्रकाशात आपली समस्या दुर करतात इतकी भयानक परिस्थीती असुन, विद्युत मंडळ जाणुनबुजून सरकारला बदनाम करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला असून विद्युत मंडळाने आमचा अंत पाहू नये असाही इशारा त्यांनी मोर्चाला सामोरे आलेल्या विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिला.

संबंधित मोर्चाला हजारोंच्या संख्येने नागरीक सहभागी झाले होते. तसेच यावेळी मोर्चात कुणबी समाज मा.सरचिटणीस प्रकाश पवार, विजय सुरोशे, पंढरीनाथ घावट, विकास मोहपे, संभाजी देशमुख, विलास देशमुख, युसुफ शेख, जयवंत घावट, सचीन घरत, संजय तिवार, संजय पवार, सुरेश भांगरथ, नंदु डामसे, अनंत तळपे, पप्पु डोंगरे, धनाजी घरत, प्रविण सुरोशे, राहुल मोरे, पद्माकर कराळे, मोरेश्वर भानुशाली इत्यादी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. टोकावडे पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी नाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी विद्युत मंडळाच्या कार्यकारी अभियंता यांना मोर्चे करांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

## जिल्हा माहिती कार्यालयात छायाचित्र प्रदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जागतिक छायाचित्रण दिनाच्या निमित्ताने ठाण्यात एक खास छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, वेसाक इंडिया आणि शटर अँड लाईट क्रिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

हे प्रदर्शन ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार प्रफुल गांगुर्डे यांच्या निवडक छायाचित्रांचे असणार आहे. यामध्ये विविध विषयांवर त्यांनी क्लिक केलेली उत्कृष्ट छायाचित्रे पाहता येतील.

या प्रदर्शनाचे उद्घाटन दि.19 ऑगस्ट रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज सुमन शिवाजी सानप आणि पर्यावरण अभ्यासक तथा वृक्षपुरुष विजयकुमार कट्टी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. हे छायाचित्र प्रदर्शन दि.19 ते 22 ऑगस्ट 2025 या कालावधीत सकाळी 10.30 ते संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, टेरेस गार्डन, एसबीआय बँकेच्या वर, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार, ठाणे (पश्चिम) या ठिकाणी नागरिकांसाठी आणि छायाचित्रप्रेमींसाठी विनामूल्य खुले असणार आहे.

या उपक्रमाच्या निमित्ताने वृत्तपत्र छायाचित्रकारांचा सत्कार आणि कार्यशाळेचे ही आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात, ठाणे शहरात गेल्या 15 वर्षांपासून वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून कार्यरत असलेल्या छायाचित्रकारांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय, शुक्रवार, दि.22 ऑगस्ट रोजी सकाळी 11.30 वाजता 'छायाचित्रणाचे तंत्र आणि माहिती' या विषयावर एक मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. 'शटर अँड लाईट क्रिएशन्स' च्या माध्यमातून ही कार्यशाळा होईल. यात छायाचित्रणाचे मूलभूत तंत्र शिकायला मिळेल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी एक गुगल फॉर्म लिंक लवकरच उपलब्ध करून दिली जाईल.

या प्रदर्शनाला आणि कार्यशाळेला विद्यार्थी, नागरिक, आणि छायाचित्रप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता


# निरंकारी मिशनने साजरे केले आत्मिक जागृतीचे पर्व

## भक्तीमध्ये स्वातंत्र्याची मुक्ती – निरंकारी राजपिता रमितजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संपूर्ण भारतवर्षात जिथे स्वातंत्र्याच्या 79 व्या गौरवशाली वर्षांचा उत्सव साजरा केला, तिथे संत निरंकारी मिशनने आत्मिक स्वातंत्र्याच्या रूपात श्रद्धा आणि समर्पणाने युक्त अशा मुक्ती पर्व दिवसाचे आयोजन केले. हे पर्व केवळ एक स्मरण नाही, तर आत्मिक चेतनेची जागृती आणि जीवनाचा परम उद्देश याचे प्रतीक आहे.

मुक्ती पर्व दिवसाचा मुख्य संत समागम निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन अध्यक्षतेखाली दिल्लीतील निरंकारी ग्राउंड क्र.8, बुराडी रोड येथे आयोजित करण्यात आला तर विश्वभरातील मिशनच्या सर्व शाखांमध्येही मुक्ती पर्वाच्या निमित्ताने विशेष सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करत मिशनमध्ये होऊन गेलेल्या महान संतांना अभिवादन करण्यात आले. त्यामध्ये शहनशाह बाबा अवतारसिंहजी, जगत माता बुद्धवंतीजी, राजमाता कुलवंत कौरजी, माता सविंदर हरदेवजी, भाईसाहेब प्रधान लाभ सिंहजी, ब्रह्मर्षि ऋषि व्यासदेवजी, ब्रह्मर्षि ऋषि कमलजी, गुरबख्श सिंह 'राजकवी'जी व इतर अनेक समर्पित संतांचे हृदयपूर्वक स्मरण करुन त्यांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा प्राप्त करण्यात आली.



ठाणे व कल्याण-डोंबिवली परिसरात या निमित्ताने विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये कोपरी (ठाणे), कळवा, किसन नगर, पवार नगर, मनोरमा नगर, दिवा, डोंबिवली, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, बदलापुर अशा विविध ठिकाणांचा समावेश होता. मुंबई महानगर प्रदेशात हे पर्व मुंबई शहर, उपनगर, नवी मुंबई, पनवेल, उरण, भाईंदर, वसई-विरार आदि सुमारे 55 ठिकाणी आयोजित करण्यात आले ज्यामध्ये मोठ्या संख्येने स्थानिक भाविक-भक्तगणांनी भाग घेतला.

# भिवंडीत सार्वजनिक मंडळाच्या गणेशमुर्ती मंडपात विराजमान

## गणेश मंडळाचे पदाधिकारी व सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षांची खराब रस्ते दुरूस्त करण्याची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : येत्या 27 ऑगस्ट गणेश उत्सवाला सुरुवात होणार असल्यामुळे भिवंडी शहर व ग्रामीण भागातील सार्वजनिक गणेशोत्सव उत्सव मंडळांनी गणेश मुर्त्या वाजत गाजत आणण्यास सुरुवात केली आहे. भिवंडी महापालिका आयुक्त प्रशासन व बांधकाम विभागास शहरातील विविध भागातील मुख्य व अंतर्गत रस्ते मोठ्या प्रमाणात खड्डे पडून खराब झाले आहेत. ते तातडीने दुरूस्त करून घेण्यात यावे या संदर्भात सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ व भिवंडी पोलीस दलाच्यावतीने लेखी पत्र पाठवून मागणी करण्यात आली होती मात्र प्रशासनाने पावसाचे कारण पुढे करून दुर्लक्ष केल्यामुळे खराब रस्त्यावर हेलकावे घेत खड्ड्यातून मार्ग काढत अखेर अखेर गणेश मुर्त्या गणेश सार्वजनिक गणेश मंडळांनी काल सायंकाळी मुंबईतून आणून आपापल्या मंडपामध्ये रात्री उशिरा विराजमान केले आहेत.



पालिकेच्या या गलथान कारवाला बाबत गणेश मंडळाचे पदाधिकारी व सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवापूर्वी महापालिका प्रशासनाने शहरातील मुख्य आगमन व मिरवणूक मार्गावरील खराब रस्ते तातडीने दुरुस्त करून घ्यावे यासाठी भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी महापालिका आयुक्त प्रशासन व गणेशोत्सव मंडळ यांची सयुक्तिक बैठक 15 दिवसापूर्वी घेऊन पालिका प्रशासनाने खराब रस्ते दुरूस्ती संदर्भात सुचना दिल्या होत्या, तसेच लेखी पत्र सुध्दा दिले होते मात्र महापालिका बांधकाम विभाग प्रशासनाने त्याकडे सराईतपणे दुर्लक्ष केल्याने भिवंडीतील रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. धामणकर नाका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, साईनाथ पवार पंडीत नाना गणेश मित्र मंडळ, काप आळी गणेशोत्सव मंडळ अशा विविध मंडळानी आकर्षक असे मोठे मंडप टाकून देखावे उभारण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे नियोजित वेळे नुसार मंडपात प्राधान्याने गणेश मूर्ती विराजमान करणे आवश्यक असल्याने शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी काल रविवार चा मुहूर्त साधत वाजत गाजत रात्री उशिरा गणेश मुर्ती मंडपात आणून विराजमान करून केल्या आहेत. यावेळी काढण्यात आलेल्या गणेश मिरवणुकीत शेकडो गणेश भक्त सहभागी झाले होते.

## टावरीपाड्यात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार वाढल्याने नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी स्फूर्ती फाऊंडेशन व महाराष्ट्र उद्योजक परिवार माध्यमातून मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी, सुरक्षितता याबाबत शंखेश्वर प्रेसिडेन्सी, टावरीपाडा परिसरामध्ये सायबर सुरक्षा अभियान राबविण्यात आले.



जगात मोबाईलच्या माध्यमातून डिजिटल क्रांती झाली, संपूर्ण जग एका मोबाईल मध्ये येऊन सामावले. परंतु त्याचबरोबर अनेक तोटेही आता समोर येऊ लागले आहेत. मागील अनेक वर्षांपासून आपल्या संपूर्ण भारत देशात ओटीपी, लिंक माध्यमातून ऑनलाईन पैशांची फसवणूक होते. स्पॅम कॉल, खाजगी माहिती चोरून ब्लॅकमेलिंग प्रकार होत आहे. अनेक नागरिकांना याचा मानसिक त्रास ही झालेला आहे. पैशांची चोरी होत असून त्याचबरोबर चारित्र्याची बदनामीची धमकी देऊन पैसे उकळले जात आहेत. याबाबत परिसरातील नागरिकांमध्ये अधिका अधिक जागृती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर व महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी दिली.

# कासणे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुबई नाशीक महामार्गालगत असलेल्या कासणे येथे गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.



१५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शिक्षणप्रेमी भास्कर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कासणे येथे "विद्यार्थी सन्मान"कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, बँकऑफ इंडियाचे व्यवस्थापक निखिल बिडवी, टीडीसी बँकेचे व्यवस्थापक शरद कशिवले, ओम शांती कॉम्प्युटरचे प्रमुख संजय पटेल, वनपाल सुधीर शेलार, लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण पौर्णिमा हालके माजी सरपंच गणपत पाटील, उपसरपंच नाना गोंधळी, पोलीस पाटील जान्हवी भोईर, उद्योजक भगवान भोईर, रेल्वे मोटरमन रामदास शेळके, मुख्याध्यापीका प्रिया मेस्त्री उपस्थित होते. बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी सखोल ज्ञान आत्मसात करून शैक्षणिक क्षेत्रात पुढे जावे असे आमदार मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या भाषणात सांगितले. यावेळी दहावी, बारावी, पदवी तसेच इंजिनिअरिंग क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मानाची शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी डॉक्टर होण्यासाठी मुलीला परदेशात पाठवणारे शेतकरी देविदास पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भास्कर भोईर यांनी केले, तर उपस्थीतांची आभार सचिन गोंधळी यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह पालक उपस्थित होते.

## भाजपाच्या मंगळागौरला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एक नवी आशा महिला फाऊंडेशन व भाजपा महिला मोर्चा कल्याण ग्रामीण मंडळ 2 यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "मंगळा गौर" या कार्यक्रमात महिलांसाठी विविध पारंपरिक व संस्कृतीक खेळ, नृत्य, झिम्मा, फुगडी, उखाणे असे विविध प्रकार घेण्यात आले होते. महिलांनी खुप उत्साहात व मोठ्या संख्येने या मंगळा गौर कार्यक्रमात सहभाग घेतला होता.



महिलांना त्यांच्या दैनंदिन घर चूल मूल या चौकटीतून बाहेर पडून स्वतः साठी खळखळून आनंद घेता आला. शिवाय या स्पर्धे दरम्यान विविध बक्षिसे देखील होती. लकी ड्रॉ च्या माध्यमातून देखील बरीच बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमासाठी कल्याण पुर्वच्या आमदार सुलभा गायकवाड, भाजपा जिल्हा अध्यक्ष नंदू परब, महिला अध्यक्षा रेखा चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती उप सभापती जालिंदर पाटील, माजी उपमहापौर मोरेश्वर भोईर, माजी नगरसेवक रमाकांत पाटील, गणेश भाने, हेमलता पावशे, मंडळ अध्यक्ष आतिश चौधरी, भारत जाधव, रणजीत उघाडे, अनंता लहुडकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महिला मोर्चा अध्यक्षा प्रगती भोईर व कोषाध्यक्षा निलम भोईर यांचे विशेष योगदान होते.


प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



'भस्मांतम् शरीरम्' या शरीराचे शेवटी भस्मच व्हायचे आहे. म्हणून शिव अंगाला भस्म चर्चितात व जगाला वैराग्याचा बोध करतात. शरीराचे अतिशय लालन करू नका. नेहमी याद ठेवा की, हे शरीर एके दिवशी स्मशानात जाणार आहे. काम असा दुष्ट शत्रू आहे की, तो एकदा हृदयात शिरला तर बाहेर निघतच नाही. एकदा का कामाने हृदयात प्रवेश केला तर तुमचे सर्व शहाणपण धुळीत मिळून जाते. म्हणून जीवन, असे साधे आणि पवित्र ठेवा की मन-बुद्धीत कामाला प्रवेश करायचा अवसरच मिळू नये. शरीराचा मोह सोडून त्याला ईश्वर, सद्गुरु सेवेत समर्पित करा..

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862


# कांदळवनांचे जतन करा अन्यथा विनाश

## - डॉ.जयपाल पाटील



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आपल्या गावाशेजारील असलेल्या खाडीत व आपल्या शेतातील कांदळवनात शेतकऱ्यांनी ऊपजिवीके साठी खेखडे पालन, कालवे, शेती, पिंजऱ्यातील मत्स्य शेती, निसर्ग पर्यटन, होडी सफर व्यवसाय करून आपली आर्थिक मजबुतीकरण करु शकता. कांदळ वनाचे नुकसान, चोरी केल्यास 5 वर्ष शिक्षा, आणी 1लाख 50 हजार दंडाची आपत्ती येऊ शकेल यासाठी कांदळ वनाचा वापर योग्य करा असे मार्गदर्शन ग्रामपंचायत वाघ्रण ने आयोजित कार्यक्रमात प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर सरपंच राजेंद्र पाटील, रायगड भूषण प्रा. डॉ.जयपाल पाटील, ग्रामसेविका, सौ.सुवर्णा पाटील ग्रामपंचायत सदस्या सौ.विद्या धोदरे, हरिश्चंद्र पाटील, पत्रकार दिपक पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

आपल्या प्रास्ताविकात सरपंच राजेंद्र पाटील म्हणाले आपल्या खारेपाटातील अनेक पंचायत मधे रायगड जिल्हा परिषद तर्फे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित करण्यात येत असून याचे महत्वाचे शिक्षण आपत्ती व्यवस्थापन तज्ञ प्रा.डॉ.जयपाल पाटील हे देत असुन ते अतिशय महत्त्वाचे असल्यचे सांगितले.तर प्रा.डॉ.जयपाल पाटील म्हणाले आपले गाव कलाक्षेत्रात प्रसिद्ध आहे.गणपती, देवी, मुर्ती आणी नाटकांसाठी कै.पद्माकर पेंटर, त्याची पेंटींग मुळे अलिबागच्या माजी मंत्री मिनाक्षीताई पाटील यांनी त्याची कला दिल्लीतील महाराष्ट्र सदनात नेली.त्यानी हजारो कलाकार तयार केले.त्या प्रमाणे कांदळवन वन अधिकारी व ग्रामपंचायत च्या सहकार्याने सध्याच्या मंत्री अदिती तटकरे यांनी आपला जिल्हा पर्यटन केल्यामुळे हजारो पर्यटक आल्याने कोकण किनारपट्टीवर प्रगती झाली आहे.कांदळवनात पर्यटन केंद्र उभारण्यात येणार येऊन खेकडे, कालवे व पालन, होडी पर्यटन, आगरी मासेमारीचे जेवण, प्रसिद्ध चवळी बटाटा कोबी चणाडाळ, ऊकडीचे मोदक, गावठी लोणचे, तांदूळ पापड असे पर्यटन केले तर आपल्या चुकीने कांदळवन आपत्ती जाऊ शकते, या प्रकल्पास शासन अनुदान देते.यावेळी आरोग्य खात्याची वाहक स्वप्नील पाटील, जिल्हा ऊप प्रमुख अजय जगताप डॉ.अजित बर्गे तर पोयनाडचे पोलीस हवालदार अभिजीत थळे आदिंचे स्वागत सरपंच यांनी केले. आभार प्रदर्शन बळवंत गावंड यांनी मानले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558



Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 9082664781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com